# समाजवादी जनपरिषदेचे १ ले राज्य अधिवेशन

## शनिवार रविवार १८ व १९ नोव्हेंबर १९९५

## हरिप्रसाद मंगल कार्यालय नाज टॉकीज जवळ,

## शनिवार बाजार परभणी

साथींनो –

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ४८ वर्ष उलटून गेली पण अद्याप या देशाचे शासन कर्ते सर्व जनतेस पिण्याचे स्वच्छ पाणी पुरवू शकले नाही. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्याच्या प्रश्नाबद्दल तर विचारायलाच नको, देशाची अर्धी लोकसंख्या एकीकडे दारिद्र्याच्या व निरक्षरतेच्या खाईत लोटली जात असतांनाच राज्य कर्ते पंचताराकीत व सप्तताराकित संस्कृति विकसित करण्यात मशबूल झाले आहेत. सामाजिक न्याय लोकशाही मुल्य, स्वातंत्र्यात महिलांना समानतेची वागणूक देण्याची फक्त भाषा बोलली जात आहे.

महिलावरील बलात्कारा सारख्या घटना विकासाच्या नावाखाली दलित, अधिवासी व ग्रामींण कष्टकऱ्याना विस्तापित करण्याचे देशव्यापी षडयंत्र मुस्लीम व इतर अल्पसंख्याकांवर धर्माच्या नावात दहशत बसवण्याचे जाणीव पुर्वक प्रयत्न राजकारण व समाजकारणात समाज विरोधी व विघातक तत्वाचा मुक्त संचार हे आपण सर्व रोज उघडचा डोळचांनी पाहतो आहेत. महागाई, बेरोजगारी शिक्षणाचे सार्वत्रिकरण, बालमजुरीचे उच्चाटन यासारख्या राष्ट्रीय प्रश्नाकडे कोणत्याही राज्यकर्त्यांना वेळ नाही. एनकेन प्रकारे सत्ता मिळवण्यासाठी जात, धर्म, भाषा, पैसा, व गुंडगिरी याचा सरास वापर केला जात आहे या परिस्थितीत काबूद असण्याची आज कोणत्याही राजकीय पक्षाची ताकद नाही. तशी इच्छा शक्तीही दिसत नाही म्हणून वरील सर्व प्रश्नांना समर्थ पणें सामोरे जावून देशभरातील समय विचारी संघटना संस्था व व्यक्तींनी एकत्र येऊन एक जानेवारी पच्चानव रोजी (१ जानेवारी ९५) रोजी समाजवादी जनपरिषदेची स्थापना केली पच्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, दिल्ली, केरळ, तामिळनाडू आंध्र प्रदेश, कर्नाटक ओरिसा, महाराष्ट्र इत्यादी राज्यात समाजवादी जनपरिषदेचे काम जोरात सुरु आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढचात या देशातील सर्व सामान्य व अशिक्षित जनतेने अपुर्व त्याग करुन योग्यदान दिले त्यात त्यांनी जात धर्म भाषा, प्रान्त अशी कोणतीही संकोचित विचार येऊ दिला नाही. तो स्वातंत्र्य लढचातील सारंज जमावेशे विचार धुसर होत चाललेला आहे. त्यामुळे दिल्लीपासुन गल्लीपर्यंत आराजकतेचे वातावरण पसरले आहे. अशा आराजकतेच्या वातावरणात कोणतीही समाज वा समाजातील कोणताही घटक आपला विकास करु शकत नाही. म्हणून पुन्हा एकदा स्वातंत्र्य पुर्वी त्या स्वातंत्र्यापुर्वीचा झंझावात निर्मान करावा लागणार आहे. आणि हे करत असतांना समाजातील सर्व उपेक्षित घटकांना बरोबर घ्यावे लागणार आहे. त्यांच्यात आत्मसन्मान व योजना जागृत करावी लागणार आहे याचे भान समाजवादी जनपरिषदेत आहे या सर्व पार्शभूमिवर समाजवादी जनपरिषदेचे राज्यव्यापी अधिवेशन परभणी येथे होत आहे हा पक्ष मुळी कार्यकर्त्यांचा व त्यातही चळवळीकरणाऱ्या कार्यकर्त्यांचा असल्याने हे अधिवेशन संपन्न करण्याची जबाबदारी सर्वसामान्य लोकांची आहे. त्याच बरोबर सध्या चाललेले बरोबर नाही असे ज्यांना ज्यांना वाटते त्या सर्वांनी अधिवेशनात सक्रीय तर सहभागी व्हायचेच आहेच पण सर्व तऱ्हेची मदतही करायची आहे. आपण ती कराल अशी खात्री आहे

– आपले –

| | | |
|---|---|---|
| **विलास वाघ**<br>अध्यक्ष | | **सुभाष लोमटे**<br>सरचिटणीस |
| **ॲड. निशा शिवूरकर**<br>**अजित सरदार**<br>उपाध्यक्ष | | **विलास भोंगाडे, आप्पाराव मोरताटे**<br>**जगदीश खैरोलीया**<br>चिटणीस |
| **प्रा. के. एम. दट्टमवार**<br>परभणी जिल्हाध्यक्ष, | **एस. इनामदार**<br>परभणी शहराध्यक्ष | **श्रीनिवास कुलकर्णी**<br>स्वागताध्यक्ष |

प्रकाशक : स्वागताध्यक्ष १ ले राज्य अधिवेशन समाजवादी जन परिषद, परभणी

परिवर्तन मुद्रणालय, गंगाखेड प्रति, ५०००